नमस्कार, सी डीप आय आय टी मुंबई तर्फे या प्रशिक्षणात आपले स्वागत. हे प्रशिक्षण तुम्हाला एखादे चलचित्र विंडोज मूव्ही मेकर वापरून कसे संपादित करावे हे समजावून सांगेल.

विंडोज मूव्ही मेकर, हा मायक्रोसॉफ्ट विंडोज चा एक भाग आहे. संपादन करणारे हे सॉफ्टवेअर विंडोज च्या सर्व नवीनतम आवृत्त्यांमधे उपलब्ध आहे, अर्थात् एम ई, एक्स पी किंवा व्हिस्टा. हे तुमच्या संगणकावर नसेल तर तुम्ही हे डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट मायक्रोसॉफ्ट डॉट कॉम स्लॅश डाऊनलोडस् येथून विनामोबदला उतरवू शकता.

विंडोज मूव्ही मेकर च्या चिन्हावर डबल क्लिक करा. यामुळे एक रिकामा चलचित्र प्रकल्प तुमच्या पडद्यावर सुरू होईल. यामधे अनेक पर्याय आहेत आपण ते सगळे या प्रशिक्षणात बारकाईने पाहूयात.

पडद्यावर डाव्या बाजूस तुम्हाला मूव्ही टास्कस पॅनेल दिसेल, मध्यभागी तुम्हाला कलेक्शन पॅनेल दिसेल, आणि डिस्प्ले पॅनेल उजवीकडे दिसेल. तुम्ही प्रथमच विंडोज मूव्ही मेकर वापरत असाल तर तुमचे कलेक्शन पॅनेल रिकामे दिसेल. प्रकल्पासाठी आवश्यक असणारे सर्व चलचित्र तुकडे, ध्वनि तुकडे आणि संगीत आयात केल्यानंतर कलेक्शन पॅनेल मधे दसतील. परंतु तुम्ही हा कार्यक्रम अगोदर वापरला असल्यास पूर्वी आयात केलेले चलचित्र आणि ध्वनी तुम्हाला तुमच्या कलेक्शन पॅनेल मधे दिसतील. मुख्य मेनू मधील फाईल पर्यायावर क्लिक करून न्यू प्रोजेक्ट निवडा. यामुळे तुमच्या पडद्यावर नवीन प्रकल्पाची रिकामी चौकट दिसू लागेल. आता तुम्ही आवश्यक त्या फाइल्स विंडोज मूव्ही मेकर मधे आयात करू शकता.

मूव्ही टास्क पॅनेलमध्ये अनेकविध पर्याय आहेत - त्यातले मुख्य म्हणजे कॅप्चर व्हीडिओ, एडिट मूव्ही, फिनिश मूव्ही आणि मूव्ही मेकिंग टिप्स. कॅप्चर व्हिडिओ मधे तुम्हाला इंपोर्ट व्हिडिओ हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करा. किंवा तुम्ही मेन मेनू

मधील फाइल पर्याय निवडून त्याती इंपोर्ट इन टू कलेक्शन हा उपपर्याय निवडा. काहीही निवडल्याने इंपोर्ट फाइल संवाद चौकट उघडेल. इथे तुम्ही तुम्हाला संपादित करायचे असलेले चलचित्र योग्य पथ आणि फाइल चे नाव देऊन निवडू शकता. इंपोर्ट कळीवर क्लिक करा. निवडलेले चलचित्र आता कलेक्शन मधे आयात होत आहे. चलचित्र खूप मोठे असले तर विंडोज मूव्ही मेकर आपोआप त्याचे छोटे भाग करील. हे सर्व भाग कंट्रोल-ए दाबून निवडा. आता राइट क्लिक करून अॅड टू टाइमलाईन हा पर्याय निवडा. सर्व भाग आता कलेक्शन पॅनेल मधे दिसत असलेल्या क्रमाने टाइमलाइन वर जोडले जातील. तुम्हाला एक-एक जोडायचा असल्यास तुम्ही एक-एक भाग निवडून तो खेचून टाइमलाइन वर घेऊन जाऊ शकता.

टाइमलाइन वरचा छोटा निळा चौकोन लक्षपूर्वक पहा. याला फ्रेम हेड म्हणतात. हा टाइमलाइन वरील चलचित्राची सध्याची स्थिति दाखवतो. सामान्यपणे हा टाइमलाइनच्या सुरुवातीला असतो. पहिल्या विभागावर क्लिक करा. पहिली चौकट किंवा चलचित्राची सुरूवात आता डिस्प्ले पॅनेल मधे दिसू लागेल. चलचित्र सुरू केल्यावर ते तुम्ही डिस्प्ले पॅनेल मधे पाहू शकता. डिस्प्ले पॅनेल च्या तळाशी तुम्ही व्ही सी आर कंट्रोल्स पाहू शकता. तुम्हाला हे समजावून देण्यापूर्वी मी हे फ्रेम हेड इथे घेऊन जाते. पहिली कळ ही प्ले किंवा पॉज आहे. प्ले केले असता फ्रेम हेड पुढे सरकतो. तुम्ही पाहू शकता की पॉज केले असता फ्रेम हेड आहे त्या ठिकाणी स्थिर रहातो. दुसरी कळ ही स्टॉप ची कळ आहे. जेव्हा ही दाबतो तेव्हा चलचित्र थांबते परंतु फ्रेम हेड हा टाइमलाइन च्या सुरुवातीला जातो. मी फ्रेम हेड इथे हलवते. तिसरी कळ ही रिवाइंड ची असून त्यामुळे एक विभाग मागे जातो येते. नीट पहा की फ्रेम हेड एका वेळी एक विभाग मागे गेले आहे. सहावी कळ ही एका वेळी एक भाग फास्ट फॉरवर्ड करण्याची आहे. नीट पहा की फ्रेम हेड एका वेळी एक विभाग पुढे गेले आहे. चौथी आणि पाचवी कळ ही अनुक्रमे एका वेळी एक चौकट पुढे किंवा मागे जाण्यासाठी आहे. हे असे.

या कळीला स्प्लिट कळ म्हणतात. ही फ्रेम हेड असलेल्या ठिकाणी एका

भागाचे दोन भाग करते-चलचित्र आणि ध्वनीचे सुद्धा. हे एक प्रभावी संपादन साधन आहे.

आता मी तुम्हाला टाइमलाइन बद्दल अधिक माहिती देते. टाइमलाइन तीन भागात वाटलेली असते - व्हिडिओ, ऑडिओ/म्युझिक आणि टायटल ओव्हरले. व्हिडिओ जवळील अधिक चिन्हावर क्लिक करा. यामुळे व्हिडिओ टाइमलाइन मोठी होऊन त्यामधील ऑडिओ टाइमलाइन दिसू लागेल. हे डबिंग करण्यासाठी उपयोगी असते. मी डबिंग कसे करावे हे दुसऱ्या एका प्रशिक्षणात समजावून दिलेले आहे. तुम्ही ते पाहू शकता. मी आता उणे चिन्हावर क्लिक करून व्हिडिओ टाइमलाइन छोटी केली.

टाइमलाइनच्यावरती तुम्ही संपादनाकरिता उपयोगी पडणारी अनेक चिन्हे पाहू शकता. झूम इन कळ व्हिडिओ टाइमलाइन मोठी करून चलचित्राची एक चौकट संपादित करणे शक्य करते. झूम आऊट कळ व्हिडिओ टाइमलाइन छोटी करून तुम्हाला संपूर्ण चलचित्र टाइमलाइन वर एकाच वेळी पहाणे शक्य करते. ही कळ म्हणजे रिवाइंड टाइमलाइन कळ आहे. ही दाबल्यास फ्रेम हेड तुमच्या चलचित्राच्या सुरुवातीला जाऊन थांबेल. ही प्ले टाइमलाइन कळ आहे. ही कळ दाबली असता डिस्प्ले पॅनेल मधे चलचित्र सुरू होईल. ही कळ व्हीसीआर कंट्रोल मधील प्ले या कळीप्रमाणेच चालते. विंडोज मूव्ही मेकर मधील वैशिष्ट्यांबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी मूव्ही टास्कस पॅनेल मधील मूव्ही मेकिंग टिप्स हा पर्याय निवडून पहा.

विंडोज मूव्ही मेकर मधील मूलभूत संरचना समजावून दिल्यानंतर आता आपण परत टाइमलाइन कडे वळू आणि चलचित्राचे विभाग जोडणे किंवा काढून टाकणे कसे करावे हे शिकू. तुम्ही एकदा चलचित्र आयात केले की ते सुरूवाती पासून शेवट पर्यंत पहा अणि तुम्हाला संपादित करायचा असलेला भाग निश्चित करून घ्या. मला या चलचित्रातील काही क्षणांचा भाग कापून टाकायचा आहे. मी हे फ्रेम हेड इथे नेते आणि हा भाग चालू करते. मी इथे हे पॉज करते कारण मला जो भाग काढून टाकायचा आहे तो इथे सुरू होतो. मी आता स्प्लिट ही कळ दाबून हा भाग इथून

वेगळा करते. हा भाग इथून स्वतंत्र झाला आहे. मी आता परते प्ले करते आणि पुन्हा मला काढून टाकायचा भाग संपल्यावर पॉज करते. नीट पहा की आता या ठिकाणी स्वतंत्र विभाग निर्माण झाला. आता मी क्लिक करून ह भाग निवडते आणि कळफलका वरील डिलीट ही कळ दाबते. नीट पहा की आता सध्याचा चलचित्र विभाग पुढे सरकला आणि अगोदरच्या विभागाला येऊन जुळला. मूव्ही मेकर चलचित्राचे सातत्य टिकवण्यासाठी हे आपोआप करते. हे कायम लक्षात ठेवा की तुम्ही जेव्हा एखाद्या चलचित्रातील काही भाग काढून टाकता तेव्हा त्यातील चलचित्र आणि ध्वनी हे दोन्ही काढून टाकले जाते. अशा प्रकारे आपण चलचित्रातला काही भाग काढून टाकू शकतो .

आता मी तुम्हाला दाखवते की सध्याच्या चलचित्रात नविन विभाग कसा जोडावा. माझ्या चलचित्रात अंतर्भूत करण्यासाठी माझ्याकडे एक छोटे चलचित्र आहे. मी इंपोर्ट व्हिडिओवर क्लिक करून कलेक्शन पॅनेल मधे ते आयात करते. मला ही फाइल इथे आणायची आहे. आता मी ती निवडते आणि इंपोर्ट ही कळ दाबते. ही फाइल आता कलेक्शन पॅनेलमधे आयात होत आहे. आता हे चलचित्र माझ्या कलेक्शन पॅनेलमधे दिसू लागले. आता मी हे खेचून टाइमलाइनवर मला हवे त्या ठिकाणी आणते. मी आता माऊसचे बटण सोडते आणि माझी फाइल सध्याच्य ठिकाणी आली. हे लक्षात घ्या की तुम्ही नवीन चलचित्र विभाग हा केवळ टाइमलाइनवर अस्तित्वात असलेल्या विभागाच्या अगोदर किंवा नंतरच जोडू शकता तो मधेच जोडण्यासाठी तुम्हाला टाइमलाइनवर असलेल्या विभागाचे तुकडे पाडावे लागतील. मला या प्रकारे मी चलचित्राचे तुकडे जोडू शकते. ही कार्यपध्दती वापरून दोन किंवा त्यापेक्षा अधिक चलचित्रे जोडली जाऊ शकतात.

तुम्हाला दाखवायचे असलेले अजून एक वैशिष्ट्य म्हणजे तुम्ही एखाद्या विभागाची किंवा त्याच्या भागाची लांबी कशी वाढवू शकता. हे वैशिष्ट्य विशेष करून डबिंग करतेवेळी अधिक उपयुक्त ठरते. कधीकधी आपण ज्या भाषेत डबिंग करत असतो त्यात तीच गोष्ट समजावून सांगण्यासाठी मूळ भाषेपेक्षा अधिक शब्द वापरले

जातात.अशा वेळी तुम्हाला ध्वनी व चित्र व्यवस्थित जुळण्याकरता चित्राची लांबी वाढवणे आवश्यक होते. चित्रपटाचा जो भाग तुम्हाला लांबवायचा आहे तो याआधी मी चित्रपट कापतेवेळी सांगितलेली पद्धत वापरून निवडा. मी हे करून दाखवते. मी फ्रेम हेड या इथे नेते. हे चलचित्र इथे कापते, प्ले करते पॉज करते, पुन्हा इथे कापते. कापलेला भाग निवडते, राइट क्लिक करून कॉपी निवडते. फ्रेम हेड मला जिथे ते जोडायचे आहे त्या ठिकाणी नेते. राइट क्लिक करून पेस्ट निवडते. तुम्ही कॉपी करण्यासाठी कंट्रोल सी व पेस्ट करण्यासाठी कंट्रोल व्ही पण वापरू शकता. अशा प्रकारे मी हे चलचित्र मला आवश्यक तितक्या क्षणांनी वाढवले. चलचित्र आवश्यकते पेक्षा थोडे लांब ठेवून संपादनाच्या अखेरीस त्यातील तुम्हाला अनावश्यक वाटणारा भाग काढून टाकणे कधीही चांगले असते. मी डिलीट करते. तुकडा निवडताना माऊसच्या हालचाली नसणारा तुकडा निवडा अन्यथा प्रेक्षकांचा गोंधळ उडण्याची शक्यता असते. हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. आपण चलचित्र वाढवण्यासाठी कॉपी आणि पेस्ट करतो. विंडोज मूव्ही मेकर वापरून करता येणाऱ्या संपादनातील या मूलभूत गोष्टी आहेत.

विंडोज मूव्ही मेकर ची ही वैशिष्ट्ये तुमचे चलचित्र संपादित करण्यासाठी वापरा. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे तुम्ही एका भाषेतील चित्रपट दुसऱ्या भाषेत करण्यासाठी तुम्ही हाऊ टू डब हे प्रशिक्षण नक्की पहा. तुम्ही एकदा मूलभूत संपादन आणि डबिंग यात तरबेज झालात की तुम्हाला त्यात वेगवेगळे विशेष परिणाम कसे द्यावेत, शीर्षके कशी द्यावीत , संगीत किंवा ध्वनी कसे जोडावे यासाठीचे प्रशिक्षण बघायला नक्कीच आवडेल. तुम्ही आमचे संकेतस्थळ अर्थात डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट स्पोकन ट्युटोरियल डॉट ओ आर जी हे पाहू शकता. या स्थळावर विविध ऑपरेटिंग सिस्टिम्स मधील प्रशिक्षणे बनवणे, ती संपादित करणे आणि त्यांचे डबिंग करणे याबद्दलची माहिती आहे. ही माहिती तुम्हाला उपयुक्त होती अशी मी आशा करते. मी चैत्राली, सी डीप आयआयटी मुंबई तुमची रजा घेते. धन्यवाद.